साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. ०८ डिसेंबर २०२५ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...

न्यू सुधांशू प्रिंटर्स

श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075

कापडी पिशव्या छापून मिळतील.

## पक्षश्रेष्ठींनी सोडले वाऱ्यावर...लढलो जनतेच्या आधारावर...! - बहादूरभाई

परळी वैजनाथ (बातमीदार) 'किडनीच्या आजाराने त्रस्त... हाताला सलाईन लावलेली..., पक्षाची अपेक्षित साथ आणि जिल्हा पदाधिकाऱ्यांचेही सहकार्य नाही...' अशा चोहीकडून घेरल्या गेलेल्या परिस्थितीतही न डगमगता एकहाती प्रचाराची धुरा सांभाळून नगर परिषद निवडणूक लढवणारे काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादूरभाई हे सध्या कौतुक आणि चर्चेचा ठरले आहेत. मनुष्यबळ कमी असताना आणि आर्थिक बाजू मजबूत नसतानाही बहादुरभाई यांनी दोन्ही ताकदीशी दिलेली एकाकी झुंज हा लोकांमध्ये चर्चेचा विषय ठरली आहे.

परळी वैजनाथ नगर पालिकेची निवडणूक नुकतीच संपन्न झाली आहे. यात नगराध्यक्ष पदासाठी तिरंगी लढत झाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार आणि अजित पवार असे दोन्ही गटाचे प्रबळ उमेदवार उभे असताना काँग्रेसच्या वतीने शहराध्यक्ष बहादूरभाई यांनी तगडी फाईट दिली. बहादुरभाई यांनी सुरुवातीपासूनच महाविकास आघाडीला 'ही जागा काँग्रेसला लढू द्यावी' असा आग्रह धरला होता. मात्र राष्ट्रवादी शरद पवार गटाने शह देत नगराध्यक्ष पदासाठी माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांच्या पत्नी सौ.संध्याताई देशमुख यांना उमेदवारी दिली. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रामाणिक काम करणाऱ्या बहादूरभाई यांनी नगर पालिकेमध्ये मात्र वंचित बहुजन आघाडीच्या सहकार्याने काँग्रेसचा स्वतंत्र उमेदवार मैदानात उतरविला. सुरुवातीला पक्षश्रेष्ठींनी 'तुम्हाला लागेल ती मदत देऊ' असा शब्द बहादूरभाई यांना दिला. त्यामुळे बहादुरभाई यांनी जोरदार तयारी केली. वंचित बहुजन आघाडीला सोबत घेत त्यांनी नगराध्यक्ष पदासह सुमारे ३० जागी काँग्रेस आणि वंचित आघाडीचे उमेदवार उभे केले.

**पक्षश्रेष्ठींनी घेतले अंग काढून:-** पक्षश्रेष्ठींनी शब्द दिल्यामुळे बहादुर भाई यांनी नगराध्यक्ष पदासाठी मैमुना बेगम सय्यद हनीफ ऊर्फ बहादूरभाई यांना उभे करून सर्वच प्रभागात उमेदवार दिले. बहादूरभाई यांचा शहरात असलेला दांडगा संपर्क आणि त्यांनी राबवलेली प्रभावी प्रचार यंत्रणा यामुळे दुरंगी वाटणारी लढत तिरंगी झाली. निवडणूक ऐन रंगात आली असतानाच काँग्रेसच्या श्रेष्ठींनी अचानक आहात वर केले. पक्षाकडून म्हणावे तसे सहकार्य मिळाले नाही. एकही मोठा नेता प्रचाराला आला नाही किंवा पक्षाने कोणतेही आर्थिक सहकार्य केले नाही.



असे असले तरी बहादूर भाई हे 'लगान टीम' घेऊन मैदान गाजवत होते. त्यांनी राबवलेली प्रचार यंत्रणा अतिशय प्रभावी ठरवू लागली. 'एकखांबी तंबू' ठोकून मैदान मारत असतानाच पक्षाप्रमाणेच त्यांना तब्येतीनेही धोका दिला. निवडणूक ऐन 'बहरात' असतानाच त्यांना गंभीर आजाराने घेरले. अगोदरच साथीला कमी मनुष्यबळ आणि त्यात आजार यामुळे बहादुरभाई कमालीचे एकाकी पडले, पण त्यांनी मैदान सोडले नाही आणि कुठे काही कमीही पडू दिले नाही. या लढाईत समाजाने मात्र त्यांना पूर्ण सहकार्य केल्याचे दिसून येते.

**हाताला सलाईन अन् कानाला मोबाईल:-** नगर पालिका निवडणूक वातावरण तापलेले असतानाच बहादूरभाईंना किडनीचा गंभीर आजार निदान झाला. डॉक्टरांनी सक्तीच्या विश्रांतीचा सल्ला दिला. असे असले तरी बहादुरभाई यांनी एका हाताला सलाईन लावून कानाला मोबाईल ठेवत कार्यकर्ते-मतदारांशी संवाद कायम ठेवला. फोनवरूनच प्रचाराची सर्व यंत्रणा कार्यान्वित ठेवली. कुठेही काहीही कमी पडणार नाही याची खबरदारी घेतली. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट हे पूर्ण ताकदीने मैदानात उतरले होते. त्यांच्या दिमतीला नेते आणि कार्यकर्त्यांची मोठी फौज मैदानात होती. असे असतानाही बहादुरभाई यांनी मात्र 'लगान टीम' सोबत घेऊन निवडणूक जोरदारपणे लढवली. त्यांची एकाकी झुंज ही राजकीय क्षेत्रात आणि नागरिकांमध्ये कौतुक आणि चर्चेचा विषय ठरली.

**बहादूरभाई यांना विजयाची खात्री:-** पक्षाने पालिका निवडणुकीत कसलेही सहकार्य केले नाही. प्रचार साहित्य दिले नाही, सभा दिल्या नाहीत किंवा साधा रुमालसुद्धा दिला नाही. तरीही ते पुढे जात राहिले. आजारी असतानाही शहराच्या विविध भागात तब्बल १२ 'कॉर्नर सभा' घेऊन काँग्रेस- वंचित बहुजन आघाडीला विजयी करण्याचे आवाहन केले. पक्षाचे बरेच नेते विरोधकांना जाऊन मिळाले. काही उघडपणे तर काहींनी विरोधकांना छुपे सहकार्य करून बहादूरभाई यांना एकटे पडण्याचा प्रयत्न केला. असे असले बहादूर भाई यांना समाजाने आणि 'लगान टीम' पूर्ण सहकार्य केल्यामुळे त्यांना विजयाची खात्री आहे. ***



## संविधानामुळे देशातील नागरिकांचे मूलभूत हक्क आणि कर्तव्य अबाधित - ॲड.मनोज संकाये

परळी वैजनाथ, (बातमीदार):- महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना परळी शहरात आदरांजली अर्पण करण्यात आली. अँड. मनोज संकाये मित्र मंडळाच्या वतीने रेल्वे स्टेशन परिसरातील पूर्णाकृती बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. या वेळी सामाजिक सलोखा, समता आणि संविधानिक मूल्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे आवाहन करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना अँड. मनोज संकाये म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या भारतीय संविधानामुळेच आपल्या देशातील मूलभूत हक्क आणि कर्तव्ये अबाधित आहेत. सामाजिक न्याय आणि लोकशाहीची भक्कम पायाभरणी बाबासाहेबांनी केली असून त्यांचे विचार प्रत्येक पिढीला मार्गदर्शन करणारे आहेत. कार्यक्रमास मित्र मंडळातील पदाधिकारी, स्थानिक नागरिक तसेच युवा मोठ्या संख्येने उपस्थित होते. महापरिनिर्वाण दिनानिमित्त बाबासाहेबांच्या कार्याचे स्मरण करून समाजात बंधुता, समानता आणि प्रबोधनाचा संदेश देण्याच्या निर्धार व्यक्त करण्यात आला. यावेळी राहुल कांदे, कैलास रिकीबे, शिवा बडे, वैजनाथ केंद्रे, प्रवीण रोडे, सुंदर आव्हाड, संतोष कांबळे, अनिल चौधरी आदी उपस्थित होते. **

**सा.परळी परिसर चे वार्षिक वर्गणीदार व्हा!**

**-० अंकासाठी संपर्क ०-**

**मो.९४२२३२८४९३**

## अखिल भारतीय ग्राहक पंचायत परळी शाखेच्या वतीने ग्राहक जागरण अभियानाला सुरुवात




परळी वैजनाथ, (बातमीदार):- अखिल भारतीय ग्राहक पंचायत शाखा परळीच्या वतीने ग्राहक जागरण अभियानाला नुकतीच येथे सुरूवात करण्यात आली.

स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून हे अभियान सुरू केले गेले. यावेळी ग्राहक पंचायतीच्या अध्यक्षा चित्रा देशपांडे, महिला प्रमुख विजया दहिवाळ, विद्या खिस्ते, प्रिती टाक, तारावती बन्सल, सुनिता निर्मळे, मंगला भोयटे, सुरेखा बावस्कर यांच्यासह ज्येष्ठ शिक्षक जी.एस.सौंदळे आदी यावेळी उपस्थित होते. प्रास्ताविक विजया दहिवाळ यांनी केले. ग्राहक पंचायतीच्या कार्याची ओळख देवून बदलत्या परिस्थितीत ग्राहकांनी सदैव जागरूक राहिले पाहिजे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

ग्राहक पंचायत शाखा परळीच्या अध्यक्षा चित्रा देशपांडे यांनी ग्राहकांनी जागरूकता दाखवणे महत्वाचे असल्याचे सांगून ग्राहक चळवळ अधिक व्यापक होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन केले. ग्राहक जागरण अभियान यशस्वी करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा असेही त्या म्हणाल्या.*

## परळीत प्लॉटींग मालकाकडून पंधरा फुटाच्या नालीवर अतिक्रमणाचा प्रयत्न

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी शहरातील नेहरू चौक भागात असलेल्या जुन्या प्रभात टॉकीजच्या जागेवर राहुल अरुण टाक हे प्लॉटींगचा व्यवसाय करत असुन यासाठी त्यांनी रस्त्यालगत असलेल्या पंधरा फुटाची नाली बुजवुन अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केल्यानंतर या भागातील नागरीकांनी यास विरोध केला.न.प.प्रशासनाकडुन सदरील अतिक्रमण काढुण घेण्याच्या सुचना टाक यांना दिल्या आहेत.

परळी शहर व परिसरात प्लॉटींगचा व्यवसाय करणारे राहुल अरुण टाक हे नेहरू चौक भागात असलेल्या जुन्या प्रभात टॉकीजच्या जागेवर प्लॉटींग काढत आहेत.या जागेला असलेला मुख्य



रस्ता सोडुन जागेच्या शेजारी असलेल्या पधरा फुटाच्या नालीत दगड व पाईप टाकुन त्या नालीवर बांधकाम करत अतिक्रमण सुरु होते.यामुळे पंचवटी नगर, स्नेहनगर, संत सोपानकाका मंदिराकडे जाणाऱ्या वाहतुकीस अडथळा निर्माण होणार असुन बसवेश्वर कॉलनी भागातुन येणारे पावसाचे पाणी अडले जावुन परिसरातील घरांमध्ये घुसण्याच्या भितीमुळे नागरीकांनी या अतिक्रमणास विरोध करत ही बाब नगरपालिका प्रशासनाच्या समोर मांडली. न.प. कर्मचाऱ्यांनी सदरील अतिक्रमणाची पहाणी करुन सदरील अतिक्रमण तात्काळ काढुन टाकण्याच्या सुचना केल्या आहेत.***

## परळी पालिकेच्या चार प्रभागातील पाच नगरसेवकांच्या जागेसाठी २० डिसेंबरला मतदान

परळी वैजनाथ (बातमीदार):- परळी नगरपालिका निवडणुकीत आक्षेप नोंदवलेल्या चार प्रभागातील पाच जागांच्या निवडणुका २ डिसेंबर ऐवजी २० डिसेंबर रोजी घेण्यात येणार आहेत. परळी नगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना निवडणुक आयोगाच्या परिपत्रकानुसार आक्षेप आलेल्या जागांपैकी प्रभाग क्रमांक ३ मधील दोन्ही जागासह प्रभाग क्रमांक ९ अ, प्रभाग क्रमांक ११ ब आणि प्रभाग क्रमांक १४ ब या पाच जागेवरची निवडणूक दि.२० डिसेंबर रोजी होणार आहे. यासाठी निवडणुक कार्यक्रम दि.४ डिसेंबर रोजी जारी होणार आहे.अर्ज मागे घेण्याची १०/१२/२०२५ तारीख, आवश्यकते प्रमाणे निवडणूक चिन्ह वाटप ११/१२ /२०२५, आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक २०/१२/२०२५ आणि दि.२१ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार असल्याचे निवडणुक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर यांनी जाहिर केले आहे.

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ-२०२५/सुनिका/नप/प्र.क्र.१४/का.६, दि.२९/११/२०२५ सोबतचे सहपत्र न्यायालयीन अपील दाखल झालेल्या तसेच उपरोक्त दि.२९/११/२०२५ च्या पत्रातील परिच्छेद-३ मधील नमूद ४ बाबींमुळे बाधित झालेल्या नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रम-२०२५ जाहिर करण्यात आला पुढील प्रमाणे, जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याची तारीख ०४/१२/२०२५, नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक १०/१२/२०२५ दुपारी ०३.०० वाजेपर्यंत,आवश्यकते प्रमाणे निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक ११/१२/२०२५ तर मतदानाचा दिनांक २०/१२ / २०२५ सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत राहणार आहे. मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक २१/१२/२०२५ सकाळी १०.०० वाजल्यापासून असणार आहे. परळी नगर परिषद निवडणुकीतील चार प्रभागांमधील निवडणूक प्रक्रिया स्थगित करण्यात आली आहे. प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार खालील वार्डांमध्ये मतदान पुढे ढकलण्यात आले आहे प्रभाग क्र. ३ : अ व ब, प्रभाग क्र. ९ : अ, प्रभाग क्र. ११ : ब,प्रभाग क्र. १४ : ब,स्थगित झालेल्या या चारही प्रभागांमध्ये आवश्यक असल्यास २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार असून मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणी पार पडणार आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत व्हावी यासाठी सर्व संबंधित विभागांना प्रशासनाने आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत. ✻

## परळी नगर पालिकेच्या निवडणुकेसाठी ६४.५१ मतदान; २१ डिसेंबरला मतमोजणी


परळी वैजनाथ (बातमीदार):- परळी नगर पालिकेसाठी ६४.५१ टक्के मतदान झाले. किरकोळ प्रकार वगळता हे मतदान शांततेत पार पडले. नगराध्यक्षपदासह नगरसेवकाच्या ३० जागेसाठी हे मतदान झाले.

परळी नगर पालिकेसाठी या निवडणुकीत एकूण ७९ हजार ५६९ मतदारांची नोंद झाली होती. त्यात ४१ हजार २३ पुरूष मतदार व ३८ हजार ५४३ स्त्री मतदार होते. या निवडणुकीत एकूण ८८ मतदान केंद्र शहरात कार्यान्वित करण्यात आली होती. गेल्या मंगळवारी (दि.२) सकाळी साडेसात ते साडेपाच पर्यंत एकूण ५१ हजार ३३२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यात २७ हजार २२७ पुरूष व २४ हजार १०३ स्त्री मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदान झालेले मतदान यंत्र परळी पालिकेत स्ट्रॉंग रूमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्याखाली सुरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. या ठिकाणी चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. मतदान यंत्र ठेवलेली स्ट्रॉंग रुम सिलबंद केलेली आहे. शहरातील चार प्रभागातील पाच जागांच्या निवडणुका निवडणूक नियोग आयोगाच्या सुचनेनुसार येत्या २० डिसेंबरला होणार असल्याने सर्व मतमोजणी २१ डिसेंबरला होणार आहे. तो पर्यंत झालेल्या मतदानाचे मतदान यंत्र या ठिकाणी पोलिस बंदोबस्तात ठेवले गेले आहे. मोठ्या चुरशीच्या झालेल्या या निवडणुकीत कोणाचा विजय होतो याची मोठी उत्सुकता येथे आहे. ✻✻✻

**परळी नगर परिषद निवडणूक २०२५**
**प्रभाग निहाय झालेले मतदान व टक्केवारी**

| प्र.क्र. | एकूण मतदान | झालेले मतदान | मतदान टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ३३६९ | १७७१ | ५२.५७ |
| २ | २२५४ | १६७७ | ७४.७० |
| ३ | ४५८४ | २९६३ | ६४.६४ |
| ४ | ४६८५ | ३३२७ | ७१.०१ |
| ५ | ५०७१ | ३२३४ | ६३.७७ |
| ६ | ४२२० | २७२४ | ६४.५५ |
| ७ | ३९४३ | २३६३ | ५९.९३ |
| ८ | ५३८६ | ३९०५ | ७२.५० |
| ९ | ५७८५ | ३६०३ | ६२.७५ |
| १० | ५४९९ | ३३५१ | ६०.९४ |
| ११ | ४३८६ | २७६३ | ५७.१३ |
| १२ | ३६०५ | १९८१ | ५४.९५ |
| १३ | ४६२० | २६४० | ५७.१४ |
| १४ | ३८६९ | २२४० | ५७.९० |
| १५ | ५५५५ | ४०१५ | ७२.२८ |
| १६ | ५२८७ | ३९३८ | ७४.४७ |
| १७ | ७०१० | ४८१० | ६८.८२ |
| एकूण | **७९५६९** | **५१३३२** | **६४.५१** |

## माती टिकेल तर शेती टिकेल आणि शेती टिकेल तर शेतकरी जगेल!



देशासाठी आणि शेतकऱ्यांसाठी सर्वाधिक महत्त्वाची कोणती गोष्ट असेल तर ती आहे माती. १७२२ साली आपल्या देशाला सोने की चिडीया म्हटल्या जायचे. ज्या वेळेस मातीतील Organic carbon २.५ होता तर आज ०.२ ते ०.३ झाला आहे. ही अतिशय चिंताजनक आणि गंभीर बाब आहे. मातीची गुणवत्ता टिकवणे आणि मृदा संधारण करणे ही काळाची गरज बनलेली असतांना मात्र मोठ्या प्रमाणावर रासायनिक खतांचा मारा केला जातोय. जलद गतीने श्रीमंत होण्याचा हव्यासच जगाला संकटाच्या खाईत लोटत आहे. उत्पादन वाढीसाठी बेमाप रासायनिक खतांचा वापर करतांना मातीची उपजत गुणवत्ता आपण खराब करत आहोत याकडे होणारी डोळेझाक आपल्याला फार मोठ्या अंधाऱ्या खाईत लोटत आहे आणि याकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे.

आपला देश हा कृषिपूजक देश आहे. सोने की चिडीया असलेल्या आपल्या विस्तीर्ण देशाची विदारक अवस्था होतांना पाहणे हे अतिशय वेदनाजनक आहे. रासायनिक शेतीला आणि रासायनिक खतांना पायबंद होणे अत्यावश्यक आहे. शासन मात्र एका अर्थाने रासायनिक शेतीला प्रोत्साहन देते की काय? असे वाटू लागते. त्याचे कारणही तसेच आहे. १ लाख ९१ हजार कोटी रुपये अनुदान प्रतिवर्षी रासायनिक खतांना आणि औषधांना दिले जाते.

माती टिकेल तर शेती टिकेल आणि शेती टिकेल तर शेतकरी जगेल मातीला अधिकाधिक उपजाऊ बनवायचे असेल, तिची गुणवत्ता जोपासून भविष्यकाळ सुधारायचा असेल तर सेंद्रिय आणि गौ आधारित शेतीकडे सर्वांना वळावे लागेल. सूक्ष्म जीवशास्त्राचा अभ्यास करून मातीचे आरोग्य सुधारण्यासाठीचे आवश्यक उपचार करावे लागतील. जमिनीत मुळतः सुप्त अवस्थेत असलेले अन्नद्रव्य झाडांना उपलब्ध करून देण्याचे काम हे सूक्ष्मजीव करतात. त्यामध्ये नत्र स्थिरीकरण करणारे रायझोबियम, अझाटोबॅक्टर, अझोस्पेरिलम या प्रकारचे जिवाणू जमिनीत अमोनिकल फॉर्म्स स्वरूपातील नत्र झाडांना नायट्रेटस फॉर्ममध्ये उपलब्ध करून देतात. तसेच जमिनीत स्फुरद आणि पालाश विरघळणारे जिवाणू असतात, ते मुख्यतः या घटकांची उपलब्धता झाडांना करून देतात. ग्लोबल विकास ट्रस्टकडे सात ते आठ मातीचे शास्त्रज्ञ आणि अभ्यासक आहेत. शेतकऱ्यांना आमचे आवाहन आहे की सिरसाळा येथील संस्थेच्या कृषीकुल प्रशिक्षण केंद्रात येऊन सेंद्रिय आणि गौ आधारित शेतीची सखोल आणि परिपूर्ण माहिती आपल्याला घेता येईल. पूर्णपणे मोफत माहिती येणाऱ्या शेतकऱ्यांना दिली जाते. जमिनीत असे काही जीवाणू आहेत की जे झाडावरती येणाऱ्या बुरशीजन्य रोगांना आटोक्यात आणण्यासाठी त्याचा वापर करू शकतो. त्यामध्ये ट्रायकोडर्मा, व्हर्टीसिलियम, मेटारॅझियम, सुडोमोनास इत्यादी अशा प्रकारच्या मित्र बुरशींचा वापर करून शत्रू बुरशींना चांगल्या प्रकारे नियंत्रणात आणू शकतो. सेंद्रिय शेतीकडे वळणे किंवा त्या मार्गावर सर्वांना एकाच वेळी घेऊन जाणे ही अशक्यप्राय बाब आहे हे आपण समजू शकतो, मात्र हळूहळू आपल्याला बदलावे लागणार आहे. हानिकारक ठरणाऱ्या रासायनिक प्रकारातील शेतीला हळूहळू जमेल तसे सेंद्रिय शाश्वत शेतीकडे घेऊन जावे लागेल. काळ्या मातीतून सोने उगवू शकणाऱ्या नव्या कल्पनांना मूर्त स्वरूपात आणावे लागेल. सेंद्रिय शेतीचे तंत्र आत्मसात करून अमलात आणावे लागेल.

उत्तर भारतातील राज्यांमध्ये विशेषतः पंजाब मध्ये आपण पाहिले की, रासायनिक खतांचा आणि औषधांचा भडिमार करून हरितक्रांती घडवण्याचा प्रयत्न केला गेला. काही कालावधिकासाठी तो यशस्वीही झाल्याचे आभाशी चित्र निर्माण झाले. वास्तविक स्थितीत मात्र ते सर्व भयंकर असे कल्पनाचित्र रंगवले गेले आहे हे कालांतराने लक्षात येऊ लागले. रासायनिक अतिरेकामुळे तेथे गंभीर स्वरूपाचे आजार लोकांना होताहेत म्हणून की काय कर्करोगाशी आपला देश आणि देशातील नागरिक झुंजत आहेत. आजार झाल्यानंतर त्यावर उपचार शोधण्यापेक्षा तो आजार होऊच नये यासाठी दिशादर्शक पाऊल उचलणे गरजेचे आहे. यासाठी गौ आधारित सेंद्रिय आणि शाश्वत शेतीकडे निरोगी भविष्यासाठी पाहणे गरजेचे आहे. जागतिक मृदा दिनानिमित्त आपण सर्वजण संकल्प करूया मातीचे आरोग्य सुधारूया, सशक्त आणि सुदृढ देश बनवूया.

**– मयंक गांधी** (संस्थापक अध्यक्ष-ग्लोबल विकास ट्रस्ट सिरसाळा)

## ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिन : मानवतेला जागवणारा विचारांचा शाश्वत तेजोदीप

सहा डिसेंबर हा दिवस भारताच्या सामाजिक क्रांतीचा, समानतेच्या संघर्षाचा आणि परिवर्तनाच्या अखंड प्रवासाचा एक मौन पण जीवन्त साक्षीदार आहे. या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे देहावसान झाले, परंतु त्यांचे विचार, त्यांची क्रांती, आणि त्यांनी पेटवलेली समतेची मशाल आजही तेजाने जळत आहे. बौद्ध धम्मपरंपरेत महापरिनिर्वाण या शब्दाचा अर्थ आहे. अंतिम शांतता, जन्ममरणाच्या चक्रातून मुक्ती, आणि आत्म्याची सर्वश्रेष्ठ अवस्था. म्हणूनच बाबासाहेबांच्या देहावसानाला 'महापरिनिर्वाण' असे संबोधले जाते कारण त्यांचे जीवन केवळ संपले नाही; ते विचाररूपाने अनंत झाले.

इतिहास कधी व्यक्ती निर्माण करत नाही; व्यक्तीच इतिहास निर्माण करतात. बाबासाहेबांचे जीवन म्हणजे संघर्ष, प्रज्ञा आणि माणुसकीची अविचल ओढ. अस्पृश्यतेच्या वेदना अंगावर झेलत वाढलेल्या एका बालकाने, अपमान आणि अडथळ्यांना ज्ञानाने उत्तर देत, संपूर्ण जगाला मानवतेचा अर्थ शिकवला. शिक, संघटित हो आणि संघर्ष कर या त्यांच्या त्रिसूत्रीने आजही कोट्यवधी लोकांना उभारी दिली आहे. संविधान निर्मिती हे त्यांचे महास्कंदाचे कार्य. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही चार मूल्ये त्यांनी फक्त कागदावर नाही, तर लोकांच्या आत्म्यात कोरली. माझे संविधान हे दुर्बलांची ढाल आहे असे ते म्हणत आणि आजही भारतातील प्रत्येक न्यायाच्या लढ्यात ही ढाल चमकते आहे.

बाबासाहेबांचे विचार केवळ कायद्यापुरते मर्यादित नव्हते. अर्थव्यवस्था, मजूर हक्क, महिला स्वातंत्र्य, विज्ञानाधिष्ठित समाज, शिक्षणातील समानता, जातिनिर्मूलन या सर्व क्षेत्रांत त्यांनी दूरदर्शी परिवर्तनाची पायाभरणी केली. १९५६ मध्ये त्यांनी बौद्ध धम्म स्वीकारला; कारण धम्म म्हणजे समानतेचा, अहिंसेचा आणि विवेकाचा मार्ग. अंधश्रद्धा, असमानता आणि मानसिक गुलामगिरी यांचे त्याग करून नवजीवन स्वीकारण्याचा दिवस म्हणजे धम्मदीक्षा आणि बाबासाहेबांचे हे



पाऊल आजही लाखो लोकांच्या जीवनात प्रकाश फाकवते. प्रत्येक वर्षी महाराष्ट्र शासन, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि विविध शासकीय कार्यालयांतर्फे महापरिनिर्वाण दिनानिमित्त विशेष कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. चैत्यभूमीवर लाखो अनुयायी श्रद्धांजली अर्पण करतात. राज्यभरात डॉ. आंबेडकरांच्या जीवनकार्यावर आधारित चित्रपट, माहितीपट आणि लघुपटांचे विशेष प्रक्षेपण केले जाते । शाळा महाविद्यालयांमध्ये संविधान जनजागृती कार्यक्रम, भाषणे, वाचन स्पर्धा, संविधान प्रस्तावना वाचन आणि सामाजिक समतेवरील चर्चासत्रे घेतली जातात. विविध विभागांकडून समाजातील दुर्बल घटकांसाठी शासनाच्या योजनांची माहिती हा विशेष उपक्रम राबविला जातो. काही जिल्ह्यांमध्ये रॅली, प्रदर्शने, ग्रंथदर्शन, तसेच बाबासाहेबांच्या लेखन भाषणांचे वाचन यांचेही आयोजन होते. या माध्यमातून राज्य शासन बाबासाहेबांचे विचार जनतेपर्यंत पोहोचवत राहते.

सहा डिसेंबर १९५६ हा दिवस बाबासाहेबांसाठी जीवनाचा शेवट होता, पण समाजासाठी नव्या जागृतीचा आरंभ . आजच्या काळातही जातिभेद, असमानता, अज्ञान, गरीबी आणि अन्याय यांसारखी अनेक आव्हाने अजूनही उभी आहेत. त्यामुळे महापरिनिर्वाण दिन आपल्याला आठवण करून देतो की संविधानाचे रक्षण करणे, सामाजिक समता जपणे आणि विवेकवादी समाज उभारणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. बाबासाहेब म्हणाले होते, लोकशाही तेव्हाच टिकते जेव्हा जनता जागरूक असते. आज हीच जागरूकता अत्यंत आवश्यक आहे. आज आपण बाबासाहेबांना वंदन करतो. पण हे वंदन केवळ पुष्पांचे नसावे; ते कृतीचे असावे. योग्य तेव्हा आवाज उठवणे, न्यायासाठी उभं राहणे, शिक्षण आणि समानतेसाठी वाट उघडणे हेच खरे अभिवादन. बाबासाहेबांनी दाखवलेला मार्ग म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे जाणारा मार्ग. त्यांच्या शब्दात माणूस महान त्याच्या जातीने नाही, तर त्याच्या कृतीने होत असतो. म्हणूनच, आज एक संकल्प करूया अन्यायाविरुद्ध उभे राहू, मानवतेचा हात देऊ, आणि समतेची मशाल जपू . शेवटी एक सत्य बाबासाहेब गेले नाहीत. ते प्रत्येक पुस्तकात आहेत, प्रत्येक विचारात आहेत, प्रत्येक संघर्षात आहेत, प्रत्येक स्वाभिमानात आहेत. ते आजही जिवंत आहेत. आपल्या संविधानात, आपल्या स्वाभिमानात आणि आपल्या न्यायाच्या लढ्यात.

**–चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार , बीड**

संपादकीय...

# उर्वरित कामाला गती हवी.!

✻ सुविचार ✻

श्रध्दा असली की सृष्टीतल्या प्रत्येक गोष्टीत देव दिसतो.
स्वत:चा अवगुण शोधणं हीच गुणांची पूर्तता..!

गेल्या अनेक दशकांपासून बीड जिल्ह्याच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या परळी-बीड-नगर रेल्वे मार्गाला आता गती मिळायला सुरूवात झाली आहे. गेल्या सतरा सप्टेंबरला बीड-नगर रेल्वेचा 'श्रीगणेशा' झाल्यानंतर शनिवारी (ता.६) रेल्वे मार्गाचे काम पूर्ण झालेल्या बीड ते वडवणी दरम्यान इंजिनची चाचणी घेतली गेली आहे. यामुळे बीडकरांच्या रेल्वेच्या स्वप्नाला आता पूर्णत्व मिळण्यास खऱ्या अर्थाने सुरूवात झाली आहे, असे म्हणायला हरकत नाही. मार्गाचे उर्वरित काम गतीने पूर्ण झाल्यास लवकरच परळी-बीड-नगर या मार्गावर रेल्वे धावायला फारसा वेळ लागणार नाही असे दिसते.

ज्येष्ठ नेत्या केशरकाकू क्षीरसागर बीड जिल्ह्याच्या खासदार असल्यापासून परळी-बीड-नगर रेल्वे मार्गाचा प्रश्न कायम आहे. जिल्ह्यात झालेल्या अनेक निवडणुका रेल्वेच्या प्रश्नावर लढल्या गेल्या. तसेच अनेक निवडणुकीत हा प्रश्न महत्वाचा मुद्दा होता. जिल्ह्यातील नेत्यांचे प्रयत्न, सततचा पाठपुरावा, जनतेच्या दबावाचा रेटा, केंद्र व राज्य सरकारने दिलेला प्रतिसाद, यामुळे परळी-बीड रेल्वे मार्गाचा अनेक तपानंतर व मोठ्या संघर्षानंतर श्रीगणेशा झाला. कामाचे भूमिपूजन झाल्यानंतर या -ना-त्या कारणाने हे काम रखडतच गेले. पुढे भूसंपादन व इतर कामे सुरू झाली. परंतु ही कामेही कासवगतीने होत गेली. भूसंपादनानंतर नगरहून या रेल्वेचे काम सुरू झाले खरे पण कामालाही म्हणावी तशी गती लाभली नाही. रेल्वे रूळ टाकण्याचे काम, मार्गावर विविध पूल बांधण्याचे कामही कासवगतीनेच झाले. यामुळे या मार्गावर प्रत्यक्ष रेल्वे धावायला विलंबच होत गेला. अनेक वर्षांनी सुरूवातीला नगर ते आष्टी पर्यंतचे काम पूर्ण झाल्यावर या मार्गावर डेमू रेल्वे धावायला सुरूवात झाली. पुढे काही महिन्यांनंतर तांत्रिक अडचणीमुळे ती बंद करावी लागली. दरम्यानच्या काळात आष्टी ते बीड पर्यंत रेल्वे मार्ग टाकण्याचे व इतर बांधकामे व तांत्रिक गोष्टी पूर्ण झाल्या. यामुळे गेल्या सप्टेंबर महिन्यात सतरा सप्टेंबरला मराठवाडा मुक्ती संग्रामदिनी बीड-नगर रेल्वेचा शुभारंभ झाला. बीडहून नगरला नियमित रेल्वे धाऊ लागली.

ही रेल्वे सुरू झाल्याने बीडकरांना मोठा आनंद झाला. रेल्वेचे परळी पर्यंतचे काम गतीने पूर्ण व्हावे, ही अपेक्षा जिल्ह्यातील नागरिक व्यक्त करू लागले. बीड-नगर रेल्वे सुरू झाल्यानंतर सुमारे दोन महिन्यांनी बीड ते वडवणी पर्यंतचे रेल्वे मार्गाचे काम पूर्ण झाल्यामुळे शनिवारी (ता.६) या मार्गावर इंजिन चाचणीसाठी रेल्वे इंजिन धावले. या चाचणीचे मार्गावरील ग्रामस्थांनी मोठे स्वागत करून आनंद व्यक्त केला. बऱ्याच वर्षांचे आपले स्वप्न पूर्ण होत असल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करत होते. ही इंजिन चाचणी म्हणजे बीडच्या रेल्वेचे हे मोठे पाऊल असल्याचे दिसत होते. ही चाचणी यशस्वी झाल्यानंतर आता वडवणी-बीड-नगर पर्यंत रेल्वे धाऊ शकेल. तशी तयारीही रेल्वे प्रशासन करते आहे.

बीड ते वडवणी या रेल्वे मार्गावर रेल्वे इंजिनची चाचणी यशस्वी झाल्यानंतर आता वडवणी-तेलगाव-दिंद्रुड-सिरसाळा-परळी या रेल्वे मार्गाचे काम गतीने व्हावे, या याही मार्गावर रेल्वे धावावी, असे इथल्या नागरिकांना वाटत आहे. या मार्गाचे काम गतीने पूर्ण व्हावे म्हणून जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, नेते, कार्यकर्ते आदींनी सरकार दरबारी व्यापक प्रयत्न करणे गरजेचे आहे. दरम्यान परळी-बीड-नगर रेल्वे मार्गाला गती मिळावी म्हणून मधल्या काळात तत्कालीन रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांच्या उपस्थितीत परळीहून रेल्वे मार्ग बांधणीच्या कामाचा शुभारंभ झाला होता. परळी रेल्वे स्थानकात हा कार्यक्रम मोठ्या थाटामाटात घेतला गेला. परंतु पुढे परळीहून या मार्गाचे काम मात्र प्रत्यक्षात सुरू होऊ शकले नाही. हे काम त्यावेळी परळीतून सुरू झाले असते तर कधीच परळी-बीड-नगर रेल्वे धावली असती. दरम्यान, बीड जिल्ह्यातील घाटनांदूर-अंबाजोगाई पुढे केज-कळंब-बार्शी असा नवा रेल्वे मार्ग व्हावा तसेच सोलापूर-बीड-छत्रपती संभाजीनगर या नियोजित मार्गाला गती मिळावी ही इथल्या जनतेची असलेली मागणी पूर्ण व्हावी या शिवाय परळीहून थेट पुणे, मुंबई, तिरूपती, रामेश्वरम्, दिल्ली अशा गाड्या सुरू व्हाव्यात अशी मागणीही इथल्या नागरिकांची आहे. ***

# आंबेडकरी चळवळ : क्रांतीकडून विखंडनाकडे

**६ डिसेंबर १९५६ रोजी प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणाने भारतीय समाजजीवनात एक मोठी पोकळी निर्माण झाली. आज ६९ वर्षांनंतरही त्यांचे विचार आणि त्यांनी प्रस्थापित केलेली आंबेडकरी चळवळ कोट्यवधी लोकांसाठी प्रेरणास्रोत आहे. या महापरिनिर्वाण दिनानिमित्त, या चळवळीने भूतकाळात काय साधले, आज तिची स्थिती काय आहे आणि भविष्यात तिची दिशा काय असेल, याचे सखोल चिंतन करणे काळाची गरज आहे.**

**उद्दिष्टे आणि क्रांतीचा कालखंड:-** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेली चळवळ केवळ राजकीय किंवा आर्थिक सुधारणांची मागणी नव्हती, तर ती भारतीय समाजाच्या मूळाशी असलेल्या जातिव्यवस्थेविरुद्धची सामाजिक-सांस्कृतिक क्रांती होती.

अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाज घटकांना 'माणूस' म्हणून जगण्याचा हक्क मिळवून देणे, त्यांना सामाजिक समता, स्वातंत्र्य आणि न्याय प्रदान करणे हे मूलभूत उद्दिष्ट होते. मनुस्मृतीचे दहन, महाडचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश यांसारख्या कृतिशील आंदोलनातून समाजाला आत्मसन्मानाची जाणीव करून दिली. भारतीय संविधानाची निर्मिती हे या चळवळीचे सर्वात मोठे आणि चिरंतन यश आहे, ज्याने सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना कायदेशीर आधार दिला. बहुजन समाजातील जागरूकता, शिक्षण आणि राजकीय महत्त्वाकांक्षा वाढली. या ऊर्जेतूनच दलित पँथरसारखी लढाऊ संघटना जन्माला आली, ज्यांनी साठोत्तरी काळात चळवळीला नवी दिशा दिली. डॉ. आंबेडकरांच्या या क्रांतीला तर्कशुद्ध विचार, मानवतावादी मूल्ये आणि सामाजिक न्यायाचे सुदृढ तत्त्वज्ञान यांचा पाया होता. त्यांनी केवळ हक्क मिळवले नाहीत, तर शोषित समाजाला बुद्धी, नैतिकता आणि आत्मसन्मानाचे शस्त्र देऊन त्यांना त्यांच्या लढ्यासाठी वैचारिकदृष्ट्या तयार केले. त्यांच्या 'स्टेट अँड मायनॉरिटीज' या ग्रंथातून त्यांनी राजकीय आणि आर्थिक संरक्षणाची गरज स्पष्ट केली, जी आजही समर्पक आहे.



**आव्हाने आणि विखंडनाची दशा:-**सध्याची आंबेडकरी चळवळ अनेक स्तरांवर कार्यरत असली तरी, ती अनेक गुंतागुंतीच्या आव्हानांनी वेढलेली आहे. ही चळवळ आता केवळ दलित समाजापुरती मर्यादित राहिलेली नाही, ती ओबीसी, आदिवासी, भटके-विमुक्त आणि महिला यांच्यासह बहुजन समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत आहे. आरक्षण, खासगीकरण, महिला सुरक्षा यांसारखे विषय आता चळवळीच्या केंद्रस्थानी आहेत. शिक्षणामुळे मोठा वर्ग मध्यमवर्गात सामील झाला असून, त्यांनी आंबेडकरी विचारधारेचा प्रसार शहरी वर्तुळात नेला आहे. आज आंबेडकरी चळवळ अनेक राजकीय गटांमध्ये विखुरलेली आहे. नेतृत्वातील एकीचा अभाव आणि वैयक्तिक महत्त्वाकांक्षा यामुळे सामूहिक लढ्याची धार बोथट झाली आहे. नेतृत्वाचा अभाव, सत्ताकेंद्रित राजकारण, ईर्षा आणि प्रस्थापित पक्षांकडून 'फोडा आणि राज्य करा' या नीतीचा वापर ही

**प्रा.डॉ.सिद्धार्थ तायडे**
परळी वैजनाथ.

विखंडनाची प्रमुख कारणे आहेत. जुनी अस्पृश्यता कायद्याने संपली असली तरी, आज आर्थिक विषमता आणि सोशल मीडियावरील द्वेष या नव्या रूपांत जातीयता प्रकट होत आहे. खासगीकरण आणि उदारीकरणाचा परिणाम केवळ नोकऱ्यांवर नाही, तर भूमिहीनता आणि संसाधनांच्या (Resource) मालकीच्या मूलभूत प्रश्नांवरही होत आहे. बहुजन समाजाला उत्पादन साधनांचे (Means of Production) मालक बनवण्याचे बाबासाहेबांचे स्वप्न आजही दूर आहे, कारण भांडवलशाही व्यवस्थेत हा समाज उपेक्षितच राहिला आहे.

सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणामध्ये खासगीकरणाचे वाढते प्रमाण आरक्षणाच्या लाभांवर परिणाम करत आहे, ज्यामुळे सामाजिक न्यायाचे दरवाजे बंद होण्याची भीती आहे. केवळ जयंती किंवा स्मारके यावर जोर देत मूळ वैचारिक आणि कृतिशील कार्यक्रमाकडे दुर्लक्ष होण्याची प्रवृत्ती काही प्रमाणात दिसून येत आहे.

केवळ राजकीय विखंडनच नाही, तर संवैधानिक संस्थांच्या स्वायत्ततेवर आणि आरक्षण धोरणांवर होत असलेले सातत्यपूर्ण वैचारिक आणि कायदेशीर हल्ले हे देखील मोठे आव्हान आहे. न्यायपालिका, निवडणूक आयोग यांसारख्या संस्थांच्या निष्पक्षतेबाबत समाजातील वाढती चिंता चळवळीला सक्रिय लक्ष देण्यास भाग पाडते.

**दिशा आणि राजकीय एकीकरणाची वाटचाल:-** आंबेडकरी चळवळीला भविष्यात यशस्वी व्हायचे असेल, तर तिची दिशा स्पष्ट असणे आवश्यक आहे. सर्व आंबेडकरी विचारधारेच्या राजकीय शक्तींनी एकत्र येऊन बहुजन समाजाचा एक प्रभावी राजकीय पर्याय उभा करणे अनिवार्य आहे. केवळ आरक्षणावर अवलंबून न राहता खासगी क्षेत्रातही सामाजिक न्याय लागू करण्यासाठी धोरणात्मक आणि कायदेशीर लढा देणे. शिक्षण, तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक पुनरुज्जीवन करावे लागेल. केवळ शिक्षित नाही, तर गुणात्मकदृष्ट्या सशक्त आणि व्यावसायिकदृष्ट्या सक्षम पिढी तयार करण्यावर भर देणे, जेणेकरून ते उच्च स्तरावर नेतृत्व करू शकतील. सोशल मीडिया आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून आंबेडकरी विचारांचा प्रसार करणे आणि खोट्या माहितीचा सामना करणे आवश्यक आहे.

केवळ राजकीय एकीकरणावर भर न देता, चळवळीला बौद्धिक आणि वैचारिक नेतृत्वाची नवी फळी उभी करावी लागेल. समाज माध्यमांवरील 'पोस्ट-ट्रुथ' (Post-Truth) च्या वातावरणात, तथ्यांवर आधारित आणि तर्कशुद्ध आंबेडकरी विचार लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी विद्वान कार्यकर्त्यांची गरज आहे. बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारलेला बौद्ध धम्म या मूल्यांना दैनंदिन जीवनात आचरणात आणणे अनिवार्य आहे. आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देणे आणि जातीभेद मिटवून सामूहिक बहुजन ओळख मजबूत करणे ही काळाची गरज आहे.

(उर्वरित पान २ वर)

'**परळी परिसर**' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com
✻ वर्ष ०९ ✻ अंक ३१ ✻ पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. ०८ डिसेंबर २०२५ ✻ किंमत : २ रू.

# ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघ

## प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध विभागात एकूण २ लाख ४० हजार ५४९ मतदार

छत्रपती संभाजीनगर, (विमाका):- भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार, दिनांक ०१ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत पदवीधर मतदारसंघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित केला आहे. सदर सुधारीत कार्यक्रमानुसार मतदारयादीच्या प्रारूप प्रसिध्दीचा दिनांक ०३ डिसेंबर, २०२५ (बुधवार) होता. त्यानुसार प्रारुप मतदार यादी आज प्रसिध्द करण्यात आली.

विभागीय आयुक्त कार्यालयात या कार्यक्रमावेळी विभागीय आयुक्त तथा ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघ मतदार नोंदणी अधिकारी जितेंद्र पापळकर, अपर आयुक्त सामान्य प्रशासन तथा सहायक मतदार नांदणी अधिकारी श्रीमती मंजुषा मिसकर यांच्यासह तसेच राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकूण ४६ हजार ४०६ पुरूष, १५ हजार ९०८ महिला व ४ तृतीयपंथी असे एकूण ६२ हजार ३१८ मतदार आहेत. जालना जिल्ह्यात एकूण २३ हजार ६४८ पुरूष, ५ हजार २७२ महिला तर २ तृतीयपंथी असे एकूण २८ हजार ९२२ मतदार आहेत. परभणी जिल्ह्यात १६ हजार ६३५ पुरूष, ४ हजार ६४ महिला तर १ तृतीपंथी असे एकूण २० हजार ७०० मतदार आहेत. हिंगोली जिल्ह्यात ६ हजार ४७६ पुरूष, १ हजार ५२८ महिला असे एकूण ६ हजार ४ मतदार आहेत. नांदेड जिल्ह्यात २३ हजार ८६७ पुरूष, ६ हजार २६४ महिला तर ४ तृतीयपंथी असे एकूण ३० हजार १३५ मतदार आहेत. लातूर जिल्ह्यात १७ हजार ४९२ पुरूष, ४ हजार ९९३ महिला तर २ तृतीयपंथी असे एकूण २२ हजार ४८७ मतदार आहे. धाराशिव जिल्ह्यात १६ हजार ७६२ पुरूष, ४ हजार ४७ महिला असे एकूण २० हजार ८०९ मतदार आहेत. बीड जिल्ह्यात ३४ हजार ४८५ पुरूष, ९ हजार ६८७ महिला तर २ तृतीयपंथी असे एकूण ४७ हजार १७४ मतदार आहेत. विभागातील आठही जिल्ह्यात एकूण १ लाख ८८ हजार ७७१ पुरूष, ५१ हजार ७६३ महिला तर १५ तृतीयपंथी असे एकूण २ लाख ४० हजार ५४९ मतदार आहेत.

पुढील अत्यंत महत्वाचा टप्पा, म्हणजेच दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी (कलम १२ अन्वये) (Period for filing of claims and objections), हा दिनांक ०३ डिसेंबर २०२५ (बुधवार) ते १८ डिसेंबर २०२५ (गुरुवार) असा निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या सर्व दावे व हरकती दिनांक ०५ जानेवारी, २०२६ पुर्वी निकाली काढण्यात येणार आहेत. अंतिम मतदार यादी प्रसिद्धी दिनांक १२ जानेवारी, २०२६ (सोमवार) असा निश्चित करण्यात आला असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. ***

(पान १ वरून).....

### आंबेडकरी चळवळ

जातिभेद आणि वंशभेद (Racism) विरोधात जगभरात सुरू असलेल्या चळवळींशी जोडणी साधून आंबेडकरवादाला आंतरराष्ट्रीय स्तरावर नेणे आवश्यक आहे.

समता आणि न्यायाची डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची शिकवण केवळ भारतासाठी नव्हे, तर जगभरातील शोषित समाजासाठी मार्गदर्शक ठरू शकते. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाखाली निर्माण झालेली ही चळवळ आज एका महत्त्वाच्या राजकीय व सामाजिक टप्प्यावर उभी आहे. चळवळीचे वर्तमान राजकीय विखंडन हे 'संघटन' या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मूलभूत तत्त्वाला लागलेली मोठी खीळ आहे. या विखंडनातून बाहेर पडून बहुजन समाजाला एकत्र आणून एक एकत्रित, व्यापक आणि प्रभावी राजकीय शक्ती उभी करणे, हीच चळवळीची भविष्यातील खरी दिशा असेल. चळवळीच्या कार्यकर्त्यांनी 'संघटित व्हा, संघर्ष करा' या या विचारावर अधिक लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. संवैधानिक मूल्यांचे रक्षण करणे आणि समताधिष्ठित समाजाच्या स्थापनेसाठी अथक प्रयत्न करणे, हेच ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खरे विनम्र अभिवादन ठरेल. ***

